इंग्रजी माध्यम

# प्रथम सत्रांत परीक्षा २०२३

वेळ : 3 तास | नववी - मराठी (निम्नस्तर) | गुण : 80

**सूचना :** १) सूचनेनुसार आकलन कृती व व्याकरण कृती यामधील आकृत्या काढाव्यात.

२) आकृत्या पेननेच काढाव्यात

३) स्वच्छता नीटनेटकेपणा व लेखन नियमानुसार लेखन याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग-१ गद्य विभाग

**प्र.१ अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेला सूचनेनुसार कृती करा.**

**१) आकृतीबंध पूर्ण करा.** (२)

सरावा दरम्यान लेखकाना लक्षात आलेली शिरीषच्या वादनाची वैशिष्ट्ये

१) ______ २) ______

नियमितपणे रोज पितापुत्राची जोडी येऊ लागली. शिरीषची प्रगती पाहून मात्र प्रसंगी मी पण आश्चर्य चकित होत होतो. त्याचा हात वाजवायला अतिशय हलका होता, आणि माझ्या सर्व विद्यार्थ्यांत त्याची आकलनशक्ती फारच दांडगी होती., नाना रोज त्याच्या बरोबर येत व एक अक्षरही न बोलता शांत बसून राहात. मी पण त्यांच्याशी बोलत नसे.

हां हां म्हणता तीन महिने निघून गेले! आणखीन तीन महिन्यांनी होणाऱ्या माझ्या विद्यालयाच्या प्रथम कार्यक्रमात, आपण शिरीषला कार्यक्रम द्यायचा, असा मी निश्चय करुन टाकला आणि त्यानुसार मी शिरीषला म्हणालो, ''शिरीष, अशीच प्रगती कायम राहू दे. आपल्या विद्यालयाच्या कार्यक्रमात मी तुझा कार्यक्रम ठेवणार आहे.'' हे ऐकल्या वर शिरीषला अत्यानंद होईल अशी कल्पना होती; पण त्याच्या चेहऱ्या वर आनंदाच्या काहीही भावना दिसल्या नाहीत. इतकेच नव्हे , तर त्याचा चेहरा काहीसा उतरला!

मी विचारले, ''काय, तुला हे ऐकून काहीच आनंद वाटत नाही का ?''. गंभीर आवाजात ठाशीव स्वरूपाचे उत्तर आले, ''माझ्या पेक्षा नानांना त्याचा आनंद जास्त होईल.'' पितापुत्र गेले आणि प्रत्येक वेळी मिळणाऱ्या शिरीषच्या तऱ्हेवाईक उत्तराचे आश्चर्य करीत मी बसलो. प्रत्येक वेळी तो नानांचे नाव का घेतो व नाना अगदी रोज त्याच्या बरोबर येतात, याचे रहस्य काय असावे या प्रश्ना चे उत्तर मला सापडेना. याशिवाय आणखीन एक शंका माझ्या मनात वरचेवर येत असे. ती म्हणजे, नाना जवळ असताना शिरीष मोकळ्या मनाने व्हायोलिन वाजवत नसावा ही. दुसरेच दिवशी शिरीष आला नाही. त्याचा हा पहिला खाडा. नसेल एखादवेळेस जमले, असे मी समाधान करून घेतले; पण त्याच्या दुसऱ्या दिवशीसुद्धा शिरीष आला नाही. चौथा दिवस गेला. पाचवा गेला आणि तसेच पंधरा दिवस गेले! शिरीषचा पत्ता नव्हता. सोळाव्या दिवशी एक मनुष्य निरोप व फीचे पैसे घेऊन आला. ''नाना आजारी असल्यामुळे शिरीष येऊ शकणार नाही', असे तो म्हणाला. थोड्याशा त्राग्यानं मी म्हणालो, ''नानांशी त्याला काय करायचे आहे! इकडे कार्य क्रम जवळ येत चालला आहे, त्याचे काय ?'' शिरीष आला नाही, त्याची वाट पाहून मी त्याचा कार्यक्रम रद्द केला. त्याचे नाव पण काढायचे नाही, असे ठरवून मी बाकीचे विद्यार्थी तयार केले.

https://www.maharashtrastudy.com

२) **चौकटी पूर्ण करा.** (२)

१) तीन महिन्यानंतर होणारा ⟶ [ ]

२) शिरीषचे तऱ्हेवाईक उत्तर ⟶ [ ]

३) **स्वमत लिहा.** (३)

शिरीषचे तऱ्हेवाईक उत्तर ऐकून लेखकांच्या मनात कोणत्या भावना आल्या असतील, याची कल्पना करुन लिहा.

**प्र.१ आ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१) **आकृतीबंध पूर्ण करा.** (२)

प्रयोग चालू असताना एडिसन जेवण व झोप अशा प्रकारे घेई

↓ [ ]  ↓ [ ]

कोणताही नवा शोध एकाएकी लागत नाही. निरीक्षण, अनुमान, प्रयोग, पुन्हा पुन्हा प्रयोग करणे हे चक्र सतत चालूच असते. एडिसनने प्लॅटिनमचा उपयोग करुन पाहिला. तो थोडा फार यशस्वी झाला; पण असला महागडा प्रयोग व्यवहार्य नव्हता.,उन्हाळ्याचे दिवस. हातातल्या पंख्याने वारा घेत असताना एडिसनचे लक्ष पंख्याच्या काडीकडे गेले. ''या बांबूपासून कार्बन करता येईल का?'' मनात विचार आला, की लगेच प्रयोगांना सुरुवात. हा बांबू कोणत्या जातीचा असावा ? उष्ण कटि बंधात आणि विशेषत:, आफ्रिका आणि आशिया खंडात बांबूच्या असंख्या जातींची लागवड केली जाते. यापैकी कोणता बांबू उपयुक्त ठरेल याचा शोध घेणे आवश्यक होते. बांबूच्या जाती गोळा करण्यासाठी एडिसनच्या सहकाऱ्यांनी आफ्रिका खंडात हजारो मैल पायी प्रवास केला. त्या ठिकाणी त्यांना हिंस्त्र पशूंशी आणि मलेरियाशी सतत सामना करावा लागला. बांबूच्या जाती गोळा करण्यासाठी एडिसनने पाण्यासारखा पैसा खर्च केला. त्यातून त्याने सहा हजार प्रकारच्या बांबूच्या जाती गोळा केल्या. बांबूपासून तयार केलेली फिलॅमेंट ही अधिक काळ प्रकाश देणारी ठरली; पण अजूनही त्याच्या मनाचे पूर्ण समाधान झाले नव्हते. प्रयोग सतत चालूच होते. हे प्रयोग चालू असताना एडिसनचे चहा, जेवण आणि झोप हे सारे प्रयोगशाळेतील टेबलावरच. भूक लागली, की उभ्या उभ्याच थोडेसे खायचे, थकल्यासारखे वाटले, की बसल्या बसल्या थोडीशी डुलकी घ्यायची. तरीही कामातून थोडीशी फुरसत मिळाली, की एडिसन त्याच्या सहकाऱ्यांना समुद्रावर मासे मारायला किंवा नृत्याच्या नाही तर गाण्याच्या कार्यक्रमांना घेऊन जायचा. मन ताजेतवाने झाले, की पुन्हा कामाला सुरुवात.

२) **योग्य पर्याय शोधून वाक्य पूर्ण करा.** (२)

१) प्लेटिनमचा प्रयोग ...................... होता. (स्वस्त / फायदेशीर / महागडा / व्यवहार्य)

२) ................ कटिबंधात बांबूंच्या असंख्य जातींची लागवड केली जाते.

(शीत / शीतोष्ण / समशीतोष्ण / उष्ण)

https://www.maharashtrastudy.com

**३) स्वमत** (३)

तुमच्या मनात येणारा नवीन विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी तुम्ही कोणकोणते प्रयत्न कराल ?

**प्र.१ इ खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१) आकृतिबंध पूर्ण करा.** (१)

अशोकचक्राची वैशिष्ट्ये
→ [ ]
→ [ ]

**२) उत्तर लिहा.** (१)

झेंड्याचा केशरी रंग कोणत्या गुणांचे प्रतीक आहे

आपल्या झेंड्याचा मधला भाग पांढरा आहे. त्याचा अर्थ काय ? पांढरा रंग प्रकाशाचा, सत्याचा व साधेपणाचा निदर्शक आहे आणि त्यावरील अशोकचक्र काय सांगते ? ते सदगुणांची, धर्माची खूण सांगते. या झेंड्याखाली काम करताना आपण धर्ममय राहू, सत्यमय राहू, असा त्याचा अर्थ आहे. आपल्या वर्तनाची ही सूत्रे राहू देत. या चक्राचा आणखी काय अर्थ आहे ? चक्र म्हणजे गती, हे चक्र सांगते, की गतिमान राहा., केशरी रंग त्यागाचा व नम्रतेचा निदर्शक आहे आणि हिरवा रंग म्हणजे हरितश्यामल भूमातेचा. या ध्वजाखाली उभे राहून सेवावृत्तीने निरहंकारीपणाने आपण पृथ्वीवर स्वर्ग निर्मूया.

**३) आकृतिबंध पूर्ण करा.** (२)

१) या कृतीने पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करायचा → [ ] → [ ]

२) वर्तमानाची सूत्रे
→ [ ]
→ [ ]

**विभाग २ पद्य विभाग**

**प्र.२ अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

**'उजाड उघडे माळरानही"**

स्वागत करण्या वसंत ऋतूचे
रंग उधळले दिशा-दिशांना,
बेरड कोरड इथली सृष्टी
घेऊन आली ती नजराणा ।।१।।

गर्द पोपटी लेऊन वसने
मुरडत आली लिंबोणी,
जर्द तांबडी कर्ण फुलेही
घालून सजली नागफणी ।।२।।

लुसलुस पाने अंगोपांगी
झुले वड हा दंग होऊनी,
दुरंगी चुनरीत उभी ही
घाणेरी ही नटुनी थटुनी ।।३।।

सळसळ झळझळ पिंपळ पाने
मऊ मुलायम मोर पिसापरी,
सांबर लाल कळ्यांनी लखडून
उभे स्वागता पाणंदीवरी ।।४।।

पळसफुले ही बहरून आली
या मातीच्या अंका वरती,
कुसुमे सारी या जगातली
पाहून त्यांना मनात झुरती ।।५।।

आंब्याच्या मोहरातून आली
कोकिळेची सुरेल तान,
उजाड उघडे माळरानही
गाऊ लागले वसंतगान ।।६।।

**१) पुढील आकृतिबंध पूर्ण करा.** (२)

वसंतऋतूच्या स्वागतासाठी आतूर असलेले घटक

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

**२) कोष्टक पूर्ण करा.** (२)

पिंपळपाने अशी आहेत (विशेषण)

| |
|---|
| |
| |
| |
| |

**३) सहसंबंध स्पष्ट करा.** (२)

१) रंग : दिशा ⟶ दंग : ..........................

२) तांबडी : कर्णफुले ⟶ लाल : ..........................

४) स्वमत (२)

वसंतऋतुच्या आगमनाने सृष्टीत होणारे बदल तुमच्या निरीक्षणाने लिहा:

प्र.२ ब) खालील दिलेल्या कवितांपैकी कोणत्याही एका कवितेचा रसग्रहनात्मक आधारित कृती लिहा.

(... संतकृपा झाली, व्यायामाचे महत्व)

१) कवी कवयित्री : (१)

२) संदर्भ : (१)

३) कवितेतील आवडलेली ओळ : (२)

४) मध्यवर्ती कल्पना : (२)

५) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे : (२)

## विभाग - ३ (स्थूलवाचन)

प्र.३ खालील दिलेल्या तीन प्रश्नांपैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (६)

१) टिपा लिहा अ) वैजयंती ब) गायबगळे (२)

२) 'तुम्ही केलेला जंगल प्रवास' याविषयी थोडक्यात माहिती लिहा. (२)

३) लहान मुलांची हास्यचित्रे काढणे अवघड आहे याबाबत तुमचे मत स्पष्ट करा. (२)

## विभाग - ४ (व्याकरण विभाग)

प्र.४ अ) व्याकरण घटकावर आधारित कृती

१) खालील उदाहरणातील उपमेय, उपमान, साधर्म्यवाचक शब्द व समान धर्म ओळखा (२)

आंबा साखरेसारखा गोड आहे

अ) उपमेय ☐ ब) उपमान ☐

क) समान धर्म ☐ ड) साधर्म्यवाचक शब्द ☐

२) खालील सामासिकशब्दापासून समास ओळखा (२)

| अनु. क्र. | सामासिक शब्द | समास |
|---|---|---|
| १) | हातपाय | |
| २) | केरकचरा | |
| ३) | पाच आरत्यांचा समूह | |
| ४) | नफा तोटा | |

३) खालील तक्ता पूर्ण करा (२)

| अनु. क्र. | प्रत्यय | मुळशब्द |
|---|---|---|
| १) | शाळेत | |
| २) | मित्राशी | |

https://www.maharashtrastudy.com

**४) वाक्प्रचार व अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा.** (२)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. खंत नसणे | खेचून घेणे |
| २. उकळ्या फुटणे | इशारा करणे |
| ३. हिसकावणे | खूप आनंद होणे |
| ४. खाणाखुणा करणे | दुःख नसणे |

**प्र.४ ब) भाषिक घटकावर आधारित कृती**

**१) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** (१)

ईश्वराचे अस्तित्व मानणारा ....................

**२) समानार्थी शब्द** (१)

१) नदी ....................

२) चाक ....................

**३) लिंग बदला** (१)

१) पुरुष ....................

२) मुलगी ....................

**४) अचूक शब्द लिहा** (१)

व्यक्तिमत्त्व, व्यक्तीमत्व, व्यक्तिमत्व, व्यक्तीमत्व

**५) पुढील शब्दांपासून चार अर्थपूर्ण शब्द तयार करा.** (२)

गोकुलदास : १) ................ २) ................ ३) ................ ४) ................

**६) खालील वाक्यातील चिन्हे आणि त्यांची नावे यांचा तक्ता तयार करा.** (२)

शाब्बास ! निबंध स्पर्धेत पहिला क्रमांक मिळाल्याबद्दल तुझे खुप अभिनंदन.

| विरामचिन्हें | नावे |
|---|---|
| | ............. |
| | ............. |

https://www.maharashtrastudy.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10/-
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये पायें,
Paytm or Google Pay से

https://www.maharashtrastudy.com

## विभाग-५ उपयोजित लेखन

**प्र.५ अ) खालील कृती सोडवा** **(६)**

**१) पत्रलेखन**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

**आनंदाने, उत्साहाने सहभागी व्हा!**
**पंडिता रमाबाई विद्यालय, आंबेजोगाई**
**राज्यस्तरीय एकांकीका स्पर्धा**
**२० नोव्हेंबर**
**वरील स्पर्धेत सहभागी होण्याची संधी**
**आकर्षक पारितोषिके**
**मा. आयोजक**
**संपर्क : कलागौरव विद्यालय, आंबेजोगाई**
kalagauravvidyalaya@gmail.com

चैत्राली/चिन्मय पाटणकर सांस्कृतिक स्पर्धा या नात्याने विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी करून घेणारे विनंती पत्र आयोजकांना लिहा.

अथवा

चैत्राली/चिन्मय पाटणकर वर्गप्रतिनिधी या नात्याने, एकांकीका स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या मित्राचे/मैत्रिणीचे अभिनंदन करणारे पत्र लिहा


**किंवा**

**२) सारांश लेखन**

विभाग १ गद्य प्रश्न क्र. १ मधील (इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा १/३ सारांश लिहा.

**प्र.५ आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(१०)**

१) खालील मुद्द्यांचा उपयोग करुन आरोग्य तपासणी शिबिराची आकर्षक जाहिरात तयार करा.




https://www.maharashtrastudy.com

**२) खालील विषयावर बातमी तयार करा.**

महात्मा गांधी विद्यालय, नाशिक येथे 'हिंदी दिवस' साजरा करा.

**३) पुढील शब्दांचा वापर करून कथालेखन करा.**

| |
|---|
| कष्ट ........ जिद्द ...... वेळेचा उपयोग ....... यश |


**प्र ५ इ) पुढील तीन कृती पैकी कोणतीही एक कृती लिहा. (१०० ते १२० शब्दांत)** **(८)**

**१) प्रसंग लेखन**

अकस्मात पडलेला पाऊस

अकस्मात आलेल्या पावसापूर्वीचे वातावरण .......... प्रत्यक्ष पावसाचे / वातावरणाचे / निसर्गाचे वर्णन ................. जनजीवनावर झालेला परिणाम (विदयार्थी, फेरीवाले पादचारी, नोकरदार इ.) .......... पशुपक्षांचे वर्णन ........ पर्यावरणाचे निरीक्षण ................ मनातील भावना

**२) वैचारिक लेखन :**




**३) वैचारिक लेखन**

**"इंटरनेट चे महत्व"**

इतर सर्व माहितीच्या देवाण घेवाणाचे महत्व ......... इंटरनेटची जाळी एकमेकांशी जोडलेली ........... शैक्षणिक क्षेत्रात उपयोग ............... संशोधनाला अधिक प्रेरणा .............. आरोग्याच्या क्षेत्रात वापर ........ इंटरनेट भविष्यकाळात प्रभावी होऊ शकेल.

♠♠♠♠♠♠